ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I | ISSUE-VII | DEC. | 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# ‘‘प.पू.पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या विचारांचा युवतींवर होणारा परिणाम :एक चिकित्सक अभ्यास’’

**सौ. माधुरी उमाकांत पुरमवार**
पीएच.डी विद्यार्थी,
शिक्षणशास्त्र विभाग,
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

## सारांश

आधुनिक काळात शिक्षणांच्या प्रसारानंतर स्त्री मोठी की पुरूष मोठा या प्रश्नाला अधिकच महत्व प्राप्त झाले आहे. खरे तर वेद काळापासून स्त्री शिक्षणाची सुरवात झालेली दिसून परंतु वेद काळात कोण मोठे या प्रश्नाला स्थान नव्हते कारण त्याकाळात स्त्री पुरूष दोन्ही समान समजले जातात. स्त्री शिक्षण हे जीवन विकासासाठी, योग्य जीवन दृष्टी प्राप्त होण्यासाठी आवश्यक आहे. परंतु आधुनिक काळात स्त्री शिक्षणापाठीमागे कोणती निश्चित विचार धारा नाही. कोणताच भव्य दिव्य हेतू नाही केवळ स्त्रीची लग्नाच्या बाजारात किंमत वाढावी व त्यांना पुरूषांशी बरोबरी करता यावी या हेतूनेच शिक्षण दिले जात आहे. शिक्षणाकडे पाहण्याची दृष्टी व शिक्षण पध्दती बदलणे आजच्या काळाची गरज आहे. स्त्री शक्ती जागृत करण्यासाठी, स्त्रीयांना सुसंस्कृत बनविण्यासाठी आवश्यकता आहे ती जीवन शिक्षणाची, सद्विचारांची.

आजच्या आधुनिक युगात प. पू. पांडुरंगशास्त्री अनौपचारीक शिक्षणाद्वारे वेद, उपनिषदे व भगवद्गीतेतील विचार देवून स्त्रीयांना जीवन दृष्टी दिली आहे, युवा पिढीस जागृत केले आहे. सद्विचारामुळे, दैवी विचारामुळे माणूस बदलू शकतो हे विविध प्रयोगाद्वारे दाखवून दिले आहे. प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या विचारांचा युवतींवर काय परिणाम होतो. त्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन कसे घडून येते. याचा अभ्यास संशोधिकेने प्रस्तुत संशोधनात केला आहे.

## प्रस्तावना

शिक्षण हे जीवन विकासासाठी, जीवन दृष्टीप्राप्त होण्यासाठी प्राप्त होण्यासाठी आवश्यकता आहे. आधुनिक काळात स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढलेले दिसून येते. मात्र स्त्रीयांना

शिक्षण देण्यामागे कोणताच उदात्त हेतू दिसून येत नाही. खरे तर शिक्षणातून स्त्रीयांमध्ये हक्का सोबत कर्तव्य व समर्पणाची जाणिव निर्माण होणे आवश्यक आहे. परंतु आधुनिक शिक्षणातून केवळ हक्काचीच जाणिव करून दिली जात आहे. त्यामुळे स्त्री वर्ग कर्तव्य व समर्पणापासून वंचित होत आहे. त्यासाठी तरूणपणातच स्त्रीयांना हक्का सोबत कर्तव्य व समर्पणाचे शिक्षण मिळणे गरजेचे आहे.त्यासाठी आवश्यकता आहे ती वेद, उपनिषद, भगवद्गीतेतील विचारांची कारण या विचारामुळे स्त्रीयांमध्ये अस्मिता जागृती व त्यासोबतच कर्तव्य व समर्पणाची जाणिव निर्माण होते. असे विचार प. पू. पांडूरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्याय कार्यातून (युवती केंद्रातून) दिले जातात.

## प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांचे कार्य

प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्याय कार्यात बाल संस्कार केंद्र, युवक युवती केंद्र, महिला केंद्र, स्वाध्याय केंद्र, प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांची प्रवचने दाखविणारी कॅसेट केंद्र, भावफेरी, भक्तीफेरी याद्वारे वेद, उपनिषदे, श्रीमद्भगवद्गीतेतील दैवी, तेजस्वी, जीवन आवश्यक विचार मानवा मानवा पर्यंत पोहचविले जातात.

अनौपचारीक शिक्षणाद्वारे मानवी जीवन सुसंस्कृत बनविण्यासाठी भक्तीवर आधारीत विविध प्रयोगांची उभारणी केली जाते. उदा. शेतकऱ्यांसाठी योगेश्वरकृषी, कोळी बांधवांसाठी मत्स्यगंधा, आदिवासींसाठी घरमंदिर, डॉक्टरांसाठी पतंजली चिकित्सालय, व्यापाऱ्यांसाठी भगवती, वृक्षाबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वृक्षमंदिर इ.

## संशोधन समस्या शीर्षक

''प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या विचाराचा युवतींवर होणारा परिणाम
:एक चिकित्सक अभ्यास.''

## संशोधन समस्येतील महत्वाच्या संज्ञा व व्याख्या

| | |
|---|---|
| **प. पू. पाडुरंगशास्त्री आठवले यांचे विचार** | स्वाध्याय कार्याचे प्रणेते जीवन विकासासाठी प्रवचन वाङ्मय इ. द्वारा व्यक्त करण्यात आलेले वेद—उपनिषदे व श्रीमद् भगवद्गितेतील विचारावर आधारित प.पू. पांडुरंगशास्त्री |

| | |
|---|---|
| | आठवले यांनी मांडलेले विचार |
| **युवती** | वय वर्षे १६ ते ३० वयोगटातील तरूणी |
| **चिकित्सक** | स्वाध्याय परीवाराद्वारे तरूणांसाठी राबिवीले जाणारे उपक्रम त्यामधील युवक युवतींचा सहभाग पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या विचारामुळे मिळणारी प्रेरणा आणि विचारामुळे होणारे परिवर्तन इ. चा अभ्यास |
| **अभ्यास** | विचारांचे सातत्य पूर्वक केलेले चिंतन आणि संशाोधनात्मकदृष्ट्या अतिशय बारकाईने केलेला अभ्यास |

**संशोधन विषयाची आवश्यकता**

प्राचिन काळी कौटुंबिक, सामाजिक परिस्थीतीतून, अनौपचारीक परिस्थतीतून स्त्रीयांमध्ये जीवन मुल्य रूजविली जात असत, योग्यती जीवनदृष्टी दिली जात असे. परंतु आधुनिक शिक्षणाद्वारे केवळ हक्काचीच जाणिव करून दिली जात असल्यामुळे स्त्री मोठी की पुरूष मोठा हा प्रश्न उभा राहिला आहे. त्याच बरोबर स्त्री पुरूषांमधील विविध प्रश्नांची निर्मिती होत आहे. हे विधारक चित्र बनविण्यासाठी आवश्यकता आहे. ती वेद, उपनिषद व भगवद्गीतेतील विचारांची असे विचार प. पू. पांडुरंग शास्त्रींच्या स्वाध्याय कार्यातील युवती केंद्राद्वारे दिले जातात. विचारामुळे होणाऱ्या परिर्वनाचा अभ्यास करून लाखो तरूणींच्या (युवतींच्या) जीवनात तसे परिवर्तन घडून यावे. यादृष्टीने प्रस्तुत संशोधनाची आवश्यकता वाटते.

युवतींना ध्येयवान बनविण्यासाठी, युवतींचे जीवन सुसंस्कृत बनविण्यासाठी युवतींना मानव म्हणून जगण्याचे शिक्षण देण्यासाठी, युवतींना भारतीय संस्कृतीची श्रेष्ठता समजावून देण्यासाठी युवतींमध्ये हक्कासोबत कर्तव्यपरायणतेची निर्मीती करण्यासाठी, युवतींमध्ये विविध गुणांची निर्मिती करण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची आवश्यकता आहे.

## संशोधन विषयाचे महत्व

आजची युवती उच्च शिक्षित बनत आहे. परंतु जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या मुल्यांपासून दुरू जात आहे, आजची युवती दिशाहीन झालेली दिसुन येत आहे, केवळ हक्काच्या पाठिमागे लागून भावनाहून नितीहिन व स्वार्थी बनत आहेत.

वैदिक संस्कृती, वैदिक विचार, वैदिक जीवन पध्दती, गीता आणि उपनिषद यामधील तत्वज्ञान मानवी जीवन विकासासाठी उपयुक्त ठरते, वेद उपनिषदे गीता या सनातन ग्रंथातील विचार स्वाध्यायातील युवती केंद्रामार्फत असंख्य समजावून घेत आहेत. आणि जीवनाचे सार्थक करण्याचा प्रयत्न करीत आहेत, हेच विचार आणखी असंख्य युवतीपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

युवतींना भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठतेची जाणिव करून देण्यासाठी, युवतींना हक्कासोबतच कर्तव्य जबाबदारीची जाणिव करून देण्यासाठी, युवतींचे जीवन सुसंस्कृत बनिवण्यासाठी, युवतींना मानव म्हणून जगण्याचे शिक्षण देण्यासाठी युवतींच्या संर्वागीण विकासासाठी तसेच युवतींच्या वैयक्तीक, कौटुंबीक, सामाजिक व अध्यात्मिक विकासाठी प्रस्तूत संशोधन महत्वाचे ठरणार आहे.

## संशोधनाची उदिदष्टे

१. स्वाध्यायकार्याचे प्रणेते प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास करणे.
२. स्वाध्यायी युवती व बिगर स्वाध्यायी युवती यांच्या वैयक्तिक, सामाजिक व आध्यात्मिक जीवन विषय विचारांचा तौलनिक अभ्यास करणे.

## संशोधनाची परिकल्पना

१. स्वाध्यायी युवती व बिगर स्वाध्यायी युवती यांच्या वैयक्तिक, सामाजिक व आध्यात्मिक जीवन विषयक विचारात फरक दिसून येतो.
२. स्वाध्यायी युवती व बिगर स्वाध्यायी युवती यांच्या वैयक्तिक, सामाजिक व आध्यात्मिक जीवन फरक दिसून येत नाही.
३.

## संधोधन विषयाची व्याप्ती

अ) प्रस्तुत संशोधन १६ ते ३० वयोगटातील युवतींशी संबंधित आहे.

ब) प्रस्तुत संशोधन रायगड जिल्हयातील ५ तालुक्यातील युवतींशी संबंधीत आहे.

## संशोधन विषयाची मर्यादा

१. प्रस्तुत संशोधन १६ ते ३० वयोगटातील युवतींपुरते मर्यादीत आहे.

२. प्रस्तुत संशोधन रायगड जिल्हयातील कर्जत, खालापूर, उरण, रोहा, पेण या ५ तालुक्यातील युवतींपुरतेच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधन केवळ स्वाध्यायी (प.पू. पाडुरंगशास्त्री आठवले यांच्या) विचारावरच आधारीत आहे. त्यात इतर धार्मिक पंथाचा विचार केला गेला नाही.

## संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

## संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनासाठी ३८ बहूपर्यायी प्रश्न असणाऱ्या प्रश्नांवलीचा वापर करण्यात आला आहे. प्रश्नावलीतील प्रश्न हे वैयक्तिक सामाजिक व अध्यात्मिक जीवन विषयक विचारांवर आधारीत आहेत.

## नमुना निवड

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी रायगड जिल्हयातील कर्जत, खालापूर, उरण, रोहा, पेण तालुक्यातील १२५ स्वाध्यायी व १२५ बिगर स्वाध्यायी युवतींची निवड करून प्रश्नावली भरून घेण्यात आली.

**संशोधनाची कार्यवाही**

रायगड जिल्हयातील कर्जत, खालापूर, उरण, रोहा, पेण तालुक्यातील १२५ स्वाध्यायी, १२५ बिगर स्वाध्यायी युवतींकडून प्रश्नावली भरवून घेण्यात आली. प्रश्नावली तपासून वैयक्तिक गुणांक काढण्यात आले व संख्याशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले.

**संख्याशास्त्रीय तंत्र**

संकलीत माहितीचे विश्लेषण करण्यासाठी व अन्वयार्थ लावण्यासाठी वर्णनात्मक सांख्यिकी व अनुमानात्मक संख्यिकी या दोन्ही प्रकारच्या संख्यिकीचा वापर करण्यात आला. वर्णनात्मक सांख्यिकीद्वारे मध्यमान व प्रमाण विचलन ही विचलनशीलतेची मापे काढण्यात आली तर अनुमानात्मक सांख्यिकीतील टीपरीक्षीकेच्या आधारे परिकल्पनांचे परीक्षण करण्यात आले आणि अन्वयार्थ लावण्यात आला.

**निष्कर्ष**

**१) उद्दिष्ट क्रमांक १**

१. प.पू.पांडूरंगशास्त्री यांच्यामते शिक्षक जर ध्येयनिष्ठ असतिल तर ते विद्यार्थ्यांना निश्चितच सुसंस्कारी व सुदृढ बनवू शकतात.
२. प.पू.पांडूरंगशास्त्री यांच्यामते शिक्षकाच्या हृदयात असणारे प्रेमच खऱ्या अर्थाने बालकांना शिकवीत असते.
३. प.पू.पांडूरंगशास्त्री यांच्यामते आदर्श समाज व्यवस्था आस्तित्वात आणण्यासाठी एकवेळ माणूस सुशिक्षित नसला तरी चालेल परंतु सुसंस्कृत असला पाहिजे.
४. प.पू.पांडूरंगशास्त्री यांच्यामते विज्ञानाला जर तत्वज्ञानाची जोड दिली तरच मानवाचे जीवन खऱ्या अर्थाने समृध्द होईल
५. प.पू.पांडूरंगशास्त्री यांच्यामते वेद, भगवद्गीतेतील विचारांचे चिंतन व मनन केल्यामुळे विचारशील व गतिमान मानव संघ तयार होतो

**२) उद्दिष्ट क्रमांक २**

उद्दिष्ट क्रमांक २ वर आधारित परिकल्पना मांडण्यात आली

परिकल्पना परीक्षणावर आधारित निष्कर्ष

१. स्वाध्यायी व बिगर स्वाध्यायी युवती यांच्या सर्वांगिण विकासात फरक दिसून येतो.

२. स्वाध्यायी युवक व बिगर स्वाध्यायी युवती यांच्या संवार्गीण विकासात फरक दिसून येत नाही.

**तक्ता क्र. १**

| गट | युवतींची संख्या (नमुना) | मध्यमान Mean | प्रमाण विचलन S. D. | स्वाधीनता मात्रा df | सार्थकता स्तर | सारणी टीमूल्य Table Value | टीमूल्ये T-Value | सार्थक/ अ सार्थक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्वाध्यायी युवक | १२५ | २८.१७ | ६.३५ | २४८ | ०.०५ | १.९७ | २०.७८ | सार्थक |
| बीगर स्वाध्यायी युवक | १२५ | १३.८३ | ४.३२ | | ०.०१ | २.५९ | | |

तक्ता क्र. १ चे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, ०.०५ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्र २४८ साठी सारणी टीमूल्य १.९७ व ०.०१ स्तरावर स्वाधीनता मात्र २४८ साठी सारणी टीमूल्य २.०५ इतके आहे व प्राप्त टीमुल्ये २०.७८ इतके आहे. प्राप्त टी मूल्य सारणी टी मूल्यापेक्षा अधिक असल्यामुळे ०.०५ व ०.०१ दोन्ही स्तरावर प्राप्त टी मूल्य सार्थक आहे.

प्राप्त टी मुल्ये अधिक असल्यामुळे शून्य परिकल्पनां त्याज्य ठरली व संशोधन परिकल्पना स्वीकार्य ठरली आहे. स्वाध्यायी युवती व बिगर स्वाध्यायी युवती यांच्या वैयक्तिक, सामाजिक, आध्यात्मिक जीवन विषयक विचारात फरक दिसून आला. स्वाध्यायी युवतींचा वैयक्तिक, सामाजिक, आध्यात्मिक जीवन विषय विचार अधिक शास्त्रशुध्द व विकसीत दिसून येतात. विकास बिगर स्वाध्यायी युवतींपेक्षा अधिक दिसून आला.

**शिफारशी**

१ शिक्षकानी विद्यार्थ्यांना सुसंस्कारी बनविण्यासाठी ध्येयनिष्ठ असावे

२ विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थानी शिक्षण देण्यासाठी शिक्षकाचे वर्तन प्रेमळ असावे

३ शिक्षणाला अनौपचारिक शिक्षणाची जोड देवुन युवतीना सुसंस्कृत करण्यासाठी प्रयत्न केला जावा

४ अभ्यासक्रमात विज्ञानाला तत्वज्ञानाची जोड देवुन मानवी जिवन समृध्द बनविण्यासाठी प्रयत्न केले जावेत

५ विचाराने मानव बदलु शकतो विचार दैवी ओजस्वी असतील तर मानव क्रांती करु शकतो त्यामुळे अभ्यासक्रमात वेद, उपनिषदे व भवगद्गीतेतील विचारांचा अंगिकार करण्यात यावा

## पुढील संशोधनासाठी विषयत

१. सद्विचार ट्रस्टद्वारानिर्मित वाङ्मयाचे शैक्षणिक मूल्य आणि वाङ्मय वाचनातून घडणाऱ्या व्यक्ति परिवर्तनाचा अभ्यास.

२. स्वाध्याय परिवारातील बालसंस्कार केंद्राद्वारे राबविल्या जाणाऱ्या उपक्रमातून बालकांमध्ये होणाऱ्या मूल्य परिवर्तनाचा अभ्यास

३. स्वाध्याय परिवारातील परीक्षा, उपक्रमात सहभागी झाल्याने होणाऱ्या वर्तन बदलाचा अभ्यास.

४. स्वाध्याय परिवाराद्वारे महिला व्यक्तिमत्व विकासासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांचे शैक्षणिक मुल्यमापन.

५. स्वाध्यायी परिवारातील शिक्षण संस्थामधून दिले जाणारे शिक्षण व त्याचा व्यक्तिमत्व बालकांच्या विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.

## संदर्भ पुस्तके

१. खेर राजेंद्र (२००८), देहझाला चंदनाचा (अठरावी आवृत्ती), विहंग प्रकाशन, पुणे,

२. एष पन्था एतत्कर्म १९९९ (सातवी आवृत्ती) प्रकाशक श्री वल्लभदास जे. झवेरी, सद्विचार दर्शन, निर्मल निकेतन, मुंबई

३. मुळे रा. शा. आणि उमाठे वि. तु. १९८७ शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (द्वितीय आवृत्ती), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ, नागपूर

४. भांडरकर ऐ. म. १९९८ सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र (प्रथम आवृत्ती) नुतन प्रकाशन, पुणे.

५. भिंताडे वि. रा. (१९९९) शैक्षणिक संशोधन पध्दती (द्वितीय आवृत्ती) नुतन प्रकाशन, पुणे